# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ

जळगाव : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी, अपेक्षा आणि विविध प्रश्न जाणून घेण्यासाठी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी ‘कुलगुरू-विद्यार्थी संवाद’ या उपक्रमांतर्गत विद्यापीठाच्या ग्रंथालयातील ज्ञान स्रोत केंद्रात विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. या संवाद कार्यक्रमास सुमारे १२० विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी ज्ञान स्रोत केंद्राचे संचालक डॉ. चंद्रशेखर वाणी, विजय आहेर उपस्थित होते. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांनी केवळ पदवी मिळविण्यापुरते मर्यादित न राहता बदलत्या काळानुसार विविध कौशल्ये आत्मसात करण्याची गरज व्यक्त केली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बहुविध आणि कौशल्याधारित शिक्षणाच्या संधी उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी विद्यापीठातील ‘विशारद’ कौशल्य विकास केंद्राची माहिती विद्यार्थ्यांना दिली. या केंद्राच्या माध्यमातून ५ हजारांपेक्षा अधिक कौशल्याधारित अभ्यासक्रम उपलब्ध असून, त्यापैकी सुमारे ५० टक्के अभ्यासक्रम निःशुल्क आहेत, तर उर्वरित अभ्यासक्रम अत्यल्प शुल्कात उपलब्ध करून देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी या संधींचा लाभ घेत आपल्या शैक्षणिक ज्ञानासोबतच रोजगाराभिमुख आणि व्यावसायिक कौशल्यांचा विकास करावा, असे आवाहन त्यांनी केले.

‘कुलगुरू-विद्यार्थी संवाद’ उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यापीठात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या अडचणी थेट जाणून घेणे, त्यांच्या समस्या समजून घेणे आणि त्यावर प्रभावी उपाययोजना करणे हा आहे. तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणाशी संबंधित आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे आणि विद्यापीठातील शैक्षणिक वातावरण अधिक विद्यार्थी-केंद्रित करणे हा या उपक्रमामागील हेतू आहे.

यावेळी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सुविधा, ग्रंथालय, अभ्यासक्रम, कौशल्यविकास, विद्यार्थी सुविधा तसेच विद्यापीठाशी संबंधित विविध बाबींविषयी आपल्या समस्या आणि सूचना कुलगुरूंसमोर मांडल्या. कुलगुरूंनी विद्यार्थ्यांचे प्रश्न आणि अडचणी समजून घेत प्रत्येक बाबीची माहिती जाणून घेतली.

विद्यार्थ्यांनी मांडलेल्या समस्यांवर संबंधित विभागांशी चर्चा करून लवकरात लवकर आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी दिले. विद्यार्थ्यांनीही विद्यापीठाच्या प्रगतीसाठी आपले प्रश्न, सूचना आणि अपेक्षा सकारात्मक पद्धतीने मांडाव्यात, असे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेण्याच्या या उपक्रमामुळे विद्यार्थी आणि विद्यापीठ प्रशासन यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होण्यास मदत होणार असून, विद्यार्थी-केंद्रित शैक्षणिक वातावरण निर्मितीस या उपक्रमातून चालना मिळणार आहे.

बातमी क्र.२

जळगाव, दि. १४ ऑगस्ट २०२६ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील ज्ञान स्रोत केंद्र आणि बौद्धिक संपदा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक संपदा हक्कांविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने बौद्धिक संपदा हक्काविषयी जनजागृतीपर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. प्रवीण महाले, डॉ. डी. जी. हुंडीवाले, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक प्रा. डॉ. चंद्रशेखर वाणी यांची उपस्थिती होती.

डॉ. डी. जी. हुंडीवाले यांनी आपल्या मार्गदर्शनातून सध्याच्या ज्ञानाधिष्ठित व नवोपक्रमप्रधान युगात बौद्धिक संपदेचे संरक्षण किती महत्त्वाचे आहे, यावर सविस्तर माहिती दिली. संशोधन, लेखन, तंत्रज्ञान, सर्जनशीलता आणि नवोपक्रमातून निर्माण होणाऱ्या बौद्धिक संपत्तीचे कायदेशीर संरक्षण करण्यासाठी कॉपीराइट, पेटंट, ट्रेडमार्क आदी बौद्धिक संपदा हक्कांची माहिती असणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विशेषतः संशोधक व विद्यार्थ्यांनी आपल्या संशोधनाची मौलिकता, नवकल्पना आणि त्यातून निर्माण होणाऱ्या बौद्धिक संपदेचे योग्य प्रकारे संरक्षण करण्याबाबत जागरूक असावे, असे त्यांनी सांगितले. कार्यशाळेत बौद्धिक संपदा हक्कांची संकल्पना व महत्त्व, कॉपीराइटचे स्वरूप व संरक्षण, पेटंटची प्रक्रिया व फायदे, ट्रेडमार्कचे महत्त्व, संशोधनातील बौद्धिक संपदेचे संरक्षण तसेच नवोपक्रमाच्या संरक्षणाच्या विविध पद्धती याबाबत डॉ. हुंडीवाले यांनी मार्गदर्शन केले. संशोधकांनी संशोधन करताना केवळ नवीन ज्ञाननिर्मितीवर भर न देता त्या ज्ञानाचे कायदेशीर संरक्षण आणि योग्य वापर याकडेही लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी ज्ञान स्रोत केंद्राचे संचालक प्रा. डॉ. चंद्रशेखर वाणी यांनी विद्यापीठातील संशोधन व नवोपक्रमाला चालना देण्यासाठी ज्ञान स्रोत केंद्राची भूमिका स्पष्ट केली. बौद्धिक संपदा हक्कांविषयी विद्यार्थ्यांना व संशोधकांना आवश्यक माहिती मिळावी यासाठी विद्यापीठामध्ये बौद्धिक संपदा हक्क हा विशेष विषय उपलब्ध करून देण्यात आला आहे, तसेच या विषयाशी संबंधित विविध संदर्भग्रंथ ज्ञान स्रोत केंद्राच्या ग्रंथालयात उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रंथालयातील विविध विषयांवरील पुस्तके, संदर्भग्रंथ आणि ज्ञानसंपदा यांचा विद्यार्थ्यांनी व संशोधकांनी अधिकाधिक उपयोग करावा, असे आवाहन डॉ. वाणी यांनी केले.
सदर कार्यक्रमासाठी विजय आहेर, डॉ. नीलिमा म्हसके, प्रा.योगेश माळी, विजय पाटील, तसेच ग्रंथालयातील कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

---

मा.संपादक

कृपया वरील बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्दीस देऊन सहकार्य करावे ही विनती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता